सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग अमरावती शहर
इर्वीन चौक, अमरावती शहर दुरध्वनी क्र. 0721- 2660330
E-mail- acptraffic.cpamt@mahapolice.gov.in

जा.क. सपोआ (वा)/तात्पुरती अधिसुचना/ प्रेसनोट/41 /2025 दिनांक :-22/01/2025

# प्रेस नोट

संपुर्ण भारतात तसेच अमरावती शहरात दिनांक 26 जानेवारी, 2025 रोजी प्रजासत्ताक दिनाचा 76 वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनानिमीत्त सर्व शाळेतील लहान मुले, त्यांचे पालक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे वाहनांची रस्त्यावर फार मोठया प्रमाणात वर्दळ असते. यादरम्यान शाळा, कॉलेजचे विद्यार्थी फारच हर्षोउल्हासात असतात तसेच सामान्य नागरिक सुध्दा प्रजासत्ताकदिन साजरा करण्यासाठी रस्त्यावर येतात. अशावेळी वाहतुकीची कोंडी होवुन अपघातासारखा अनुचित प्रकार घडु नये तसेच सार्वजनिक शांतता भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता दिनांक 26/01/2025 रोजी सकाळी 06.00 वा. ते 12.00 वा. पावेतो अमरावती शहरात येणार सर्व हलक्या व जड वाहनांची वाहतुक तसेच शहरातील उड्डाणपुल (i) गाडगेनगर समाधी मंदीरापासुन ते जिल्हा स्टेडियम येथील उड्डानपुल, (ii) इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन (iii) कुथे हॉस्पीटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटो कडे जाणाऱ्या अशा तिनही महत्वाच्या उड्डानपुलावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदीचे आदेश निर्गमीत केले आहे.

सदर आदेश/अधिसुचनेचे जो कोणी वाहनचालक उल्लंघन करेल त्यांचे विरुध्द मोवाका 1988 व महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पोलीस विभागाकडुन सर्व नागरिक, वाहन धारक/वाहन चालक यांना आवाहन करण्यात येते की, जारी अधिसुचनेत नमुद कालावधीत घातलेल्या निर्बंधाचे काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागास आवश्यक सहकार्य करावे.

सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा * अमरावती *

( रिता उईके )
**प्रभारी सहायक पोलीस आयुक्त,**
**वाहतुक विभाग अमरावती शहर**

**प्रती,**
**मा.संपादक,**
**सदरची प्रेसनोट ही जनहितार्थ असल्याने आपले वर्तमान पत्रात प्रसिध्द करावी.**